# ९. उजाड उघडे माळरानही

**ललिता गादगे** (१९५४): प्रसिद्‌ध कवयित्री. ‘फसवी क्षितिजे’, ‘अग्निजळ’, ‘संवेदन’ इत्यादी कवितासंग्रह; ‘आयुष्याच्या काठाकाठाने’, ‘दु:ख आणि अश्रू’, ‘प्राजक्ताची फुले आणि दाह’ हे कथासंग्रह; ‘नाळबंधाची कहाणी’, ‘खिडकीतलं आभाळ’ हे ललित गद्य प्रसिद्‌ध.

प्रस्तुत कवितेत कवयित्रींनी वसंतऋतूच्या आगमनामुळे सृष्टीच्या निसर्गसौंदर्यातील बदलांचे मनमोहक वर्णन केले आहे.

स्वागत करण्या वसंत ऋतूचे
रंग उधळले दिशा-दिशांना,
बेरड कोरड इथली सृष्टी
घेऊन आली ती नजराणा ।।१।।

गर्द पोपटी लेऊन वसने
मुरडत आली लिंबोणी,
जर्द तांबडी कर्णफुलेही
घालून सजली नागफणी ।।2।।

लुसलुस पाने अंगोपांगी
झुले वड हा दंग होऊनी,
दुरंगी चुनरीत उभी ही
घाणेरी ही नटुनी थटुनी ।।3।।

सळसळ झळझळ पिंपळ पाने
मऊ मुलायम मोरपिसापरी,
सांबर लाल कळ्यांनी लखडून
उभे स्वागता पाणंदीवरी ।।४।।

पळसफुले ही बहरून आली
या मातीच्या अंकावरती,
कुसुमे सारी या जगातली
पाहून त्यांना मनात झुरती ।।५।।

आंब्याच्या मोहरातून आली
कोकिळेची सुरेल तान,
उजाड उघडे माळरानही
गाऊ लागले वसंतगान ।।६।।



## स्वाध्याय

**प्र. १. (अ) कारणे लिहा.**

(अ) कवयित्रीच्या मते दाही दिशांना रंग उधळले, कारण …………

(आ) जगातील सर्व फुले मनात झुरू लागली, कारण …………

**(आ) खालील आकृतिबंध पूर्ण करा.**

**वसंतऋतूच्या स्वागतासाठी आतुर असलेले घटक**

↓ ↓ ↓ ↓ ↓

**(इ) निसर्गाचे रूप खालील बाबतींत स्पष्ट करा.**

( ) ← आगमनापूर्वी — **वसंतऋतू** — आगमनानंतर → ( )

**प्र. २. सृष्टीतील खालील घटक वसंतऋतूच्या आगमनाने कसे सजले, ते स्पष्ट करा.**

| घटक | त्यांचे सजणे |
|---|---|
| (१) लिंबोणी | |
| (२) नागफणी | |
| (३) घाणेरी | |
| (४) पळसफुले | |

**प्र. ३. खालील शब्दांसाठी कवितेत आलेले समान अर्थाचे शब्द शोधा.**

(१) भेटवस्तू – ☐

(२) सजली – ☐

(३) अरुंद रस्ता – ☐

(४) फुले – ☐

**प्र. ४. भावार्थाधारित.**

(१) 'सांबर लाल कळ्यांनी लखडून उभे स्वागता पाणंदीवरी', या ओळीचा संदर्भ स्पष्ट करा.

(२) 'उजाड उघडे माळरानही गाऊ लागले वसंतगान' या ओळीतील तुम्हांला कळलेले अर्थसौंदर्य स्पष्ट करा.

**प्र. ५. अभिव्यक्ती.**

(अ) वसंतऋतूच्या आगमनाने सृष्टीत होणारे बदल तुमच्या निरीक्षणाने लिहा.

(आ) सृष्टीचे सौंदर्य कायम राहण्यासाठी तुम्हांला सुचतील असे उपाय लिहा.

GSHUCP